प्रेस नोट

## पुणे शहरांत बाहेर गावांवरुन येणारे जाणारे प्रवाशांना आपले रिक्षात भाडेतत्वांवर बसवून घेवून आडबाजूस नेवून जबरदस्तीने लुट मार करणारे गुन्हेगारांना युनिट-५ कडील पोलीसांनी केले जेरबंद

दि.३०/७/२०१७ रोजी इसम नामेः-नवरतन नायक व त्यांचा आतेभाउु काळु आपले मूळगांवी राजस्थान येथे जाणेकामी कोल्हापुर ते स्वारगेट एस.टी बसने येवून पुण्यात स्वारगेट बस स्टॅन्ड येथे दुपारी ०१.३० वा पोहचून पुणे रेल्वे स्टेशन येथे दुपारी ०३.०० वा सुमारास पुणे जयपुर अशी ट्रेन असल्याने स्वारगेट बस स्टॅन्ड मधुन बाहेर पडून पुणे रेल्वे स्टेशन येथे रिक्षाने जाणेकामी रिक्षा पाहत असतांना बाहेर उभ्या असलेल्या रिक्षा क्र-एम.एच.१२/के.आर-४६१५ मधील रिक्षा चालकाने त्यांना बसूवन काही अंतर नेवून रिक्षा थांबवून त्यामध्ये आपले जोडीदारांसही बसवून घेवून एकमेकांशी हिंदीमधून ओळख देवून काही अंतर गेलेनंतर पुन्हा रिक्षा थांबवून वरील प्रवाशी यांना खाली उतरणेस सांगून पुणे स्टेशनसाठी येथून बस मिळेल असे म्हणाल्याने प्रवाशांनी आम्हाला पुणे स्टेशनला जायचे आहे इथे कुठे रेल्वे दिसत नाही असे म्हणताच रिक्षा चालक व त्याचे रिक्षांत बसलेल्यां जोडीदाराने दोन्ही प्रवाशांना शिवीगाळ व मारहाण करीत १४००/- रुपये भाडा निकालो जल्दी. असे म्हणून त्यांचे खिशातील एकुण २,५००/-रुपये जबरदस्तीने काढून घेवून त्यांना जबरदस्तीने रिक्षाचे खाली उतरवू लागले. त्याचवेळी सदर परिसरांतून कामानिमित्त जाणारे गुन्हे शाखा युनिट-५ कडील पोलीस कर्मचारी अमजद पठाण व अंकुश जोगदंडे यांनी सदरचा प्रकार पाहिलेने त्यांनी रिक्षा चालक व त्याचे जोडीदारांस हटकून प्रवाशी यांना काय प्रकार आहे याबाबत माहिती घेतली असतां त्यांनी झाले प्रकारांबाबत तक्रार केलेने त्यांनी त्यांना आहे त्या परिस्थितीत ताब्यांत घेवून चौकशी करतां रिक्षा चालकाचे नाव विकास शंकर धोत्रे वय-३५ वर्षे धंदा-रिक्षाचालक,रा.५७० आंबेडकर नगर बालवाडी शेजारी मार्केटयार्ड पुणे व जोडीदाराचे नाव संदिप रामदास आरु वय-४६ वर्षे धंदा-रिक्षाचालक रा.खोपकर यांचे चाळीत ,वनराई कॉलनी विरसावरकर चौक धनकवडी पुणे-४३.असे असल्याचे समजलेने त्यांना स्वारगेट पोलीस स्टेशनला नेवून त्यांचेबाबत प्रवाशी यांची कायदेशीर तक्रार घेवून जबरदस्तीने प्रवाशांची लूटमार करणारे वरील दोन्ही आरोपींना अटक करणेत आलेली असून त्यांचेकडून प्रवांशाचे जबरदस्तीने लूटलेली रोख रक्कम २,५००/- व गुन्हयांत वापरलेली रिक्षा असा सर्व मिळून किं.रु.१,५५,०००/-चा मुद्येमाल जप्त करणेत आलेला आहे.तसेच सदरबाबत स्वारगेट पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.२५३/२०१७ भा.दं.वि.क. ३९४,५०४,५०६,३४ या प्रमाणेचे गुन्हयांचा पुढील तपास युनिट-५,गुन्हेशाखेचे प्रभारी अधिकारी श्री.दत्ता

चव्हाण व सपो.निरी.युवराज नांद्रे यांनी करतां वरील अटक करणेत आलेले आरोपी रिक्षा चालक व त्यांचा जोडीदार यांनी गेले वर्षभरांत बाहेरुन येणारे व जाणारे प्रवाशांना स्वारगेट,पुणे स्टेशन व शिवाजीनगर भागांत लुटले असलेबाबत कबुली दिलेली आहे.परंतू प्रवाशांनी त्याबाबत पोलीसांकडे तक्रार न केलेचे आढळून आलेले आहे.तरी वरीलप्रमाणेचे प्रकारे लुटमारी झालेले प्रवाशी नागरिकांनी वरीलप्रकारचे गुन्हे करणारे आरोपींवर कारवाई होणेकामी पोलीसांकडे येवून तक्रार दाखल करणेबाबत आवाहन करणेत येत आहे.

सदरची कामगिरी ही श्री. प्रदिप देशपांडे सो.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री.पंकज डहाणे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,पुणे,श्री. संजय निकम,सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट-५,पुणे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.दत्ता चव्हाण, स.पो.निरी.महादेव वाघमोडे, स.पो.निरी.युवराज नांद्रे,पोलीस हवालदार संतोष मोहिते,माणिक पवार, लक्ष्मण शिंदे,प्रविण शिंदे,राजेश रणसिंग,प्रदिप सुर्वे,सचिन घोलप,सिध्दराम कोळी,पोलीस नाईक महेश वाघमारे,अमजद पठाण,अंकुश जोगदंडे,प्रविण काळभोर,गणेश बाजारे,नामदेव आंगज,प्रमोद घाडगे,संजय दळवी यांनी केलेली आहे.